तरुण भारत

गुरुवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५

# जळगावमध्ये आजपासून वसुंधरा महोत्सव

## चार दिवसांचे उपक्रम : निसर्गभ्रमण ठरणार खास आकर्षण

- आज होईल उद्घाटन
- रोज सकाळी निसर्गभ्रमण
- विविध पुरस्कार देणार

प्रतिनिधी

जळगाव, दि. ११ - यावर्षीच्या किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवास जळगाव येथे उद्या (दि. १२) पासून प्रारंभ होत आहे. चार दिवसांच्या महोत्सवात विविध उपक्रम-कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन सत्र उद्या (दि. १२) ॲप्रोप्रिएट रुरल टेक्नालॉजी इन्स्टिट्यूट, पुणेच्या प्रकल्प समन्वयक तथा नेक्सस कार्बन फॉर डेव्हलपमेंट, सिंगापूरच्या डॉ. प्रिदर्शिनी कर्वे यांच्या हस्ते आणि जिल्हाधिकारी रुबल अग्रवाल, वसुंधरा महोत्सवचे अध्यक्ष तथा जैन उद्योग समुहाचे उपाध्यक्ष अशोक जैन, महोत्सव संयोजक विरेंद्र चित्राव यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या महोत्सवातील चार दिवसांचे उपक्रम व कार्यक्रम असे : गुरूवार (दि. १२) सकाळी ७ - सायकल रॅली (काव्यरत्नावली चौक), सकाळी ११ ते १ - वन्यजीव छायाचित्रण कार्यशाळा (मार्गदर्शक युवराज पाटील, पुणे, आय. एम.आर. कॉलेज जळगाव), सायंकाळी ५ - छायाचित्र प्रदर्शन पान २ वर

### रविवारी समारोप

रविवार (दि.१५) सकाळी ६ - आर्यन पार्क, सरपंच परिषद (विषय : जैव विविधतेसाठी पंचायती, उद्घाटन हस्ते महसूलमंत्री एकनाथराव खडसे) सकाळी ११ - बीजभाषण (किशोर रिठे, सदस्य महाराष्ट्र जैव विविधता मंडळ), सायंकाळी ४ - निसर्ग गाणी (सादरकर्ते - विवेकानंद प्रतिष्ठान, कांताई सभागृह), सायंकाळी ५ - समारोप व पुरस्कार प्रदान सोहळा (वसुंधरा सन्मान व पत्रकारांचा गौरव, हस्ते जलसंपदामंत्री गिरीश महाजन)

## जळगावमध्ये आजपासून...

उद्घाटन (कांताई सभागृह) त्यानंतर उद्घाटन सोहळा व पुरस्कार प्रदान (वसुंधरा मित्र व ग्रिन टीचर), व्याख्यान - शून्य कचरा व्यवस्थापन का आणि कसे? शुक्रवार (दि.१३) सकाळी ६ - निसर्गभ्रमण (लांडोरखोरी व मेहरूण तलाव), सकाळी ११ - व्याख्यान गिरीश देशमुख (विषय - बांधकाम आरेखनात शून्य टाकाऊचे महत्त्व), सकाळी १० ते १२ (महाविद्यालय परिसर) आणि सायंकाळी ६.३० ते ८.३० (कांताई सभागृह)

शनिवार (दि. १४) सकाळी ६ - निसर्गभ्रमण (जैनहिल्स), सकाळी ११ ते १ - चर्चासत्र (विषय : खान्देशातील धोकाग्रस्त पक्षी, सहभाग - जयंत वडदकर, अमरावती, अभय उजागरे, गणेश सोनार, जळगाव, अनिल महाजन, वरणगाव, अनिल माळी, नाशिक), दुपारी ३ - महिलांसाठी किचन व टेरेस गार्डन कार्यशाळा (मार्गदर्शक - अरुण सूर्यवंशी, नेचर क्लिअर असोशिएशन, सातारा), आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सकाळी १० ते १२ (महाविद्यालय परिसर), ६.३० ते ८.३० (कांताई सभागृह)